# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः20.04.2024** **वारःशनिवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील पाच जागांसाठी सरासरी 60 पूर्णांक 22 टक्के मतदानाचा प्राथमिक अंदाज
2. 2024 ची लोकसभा निवडणूक विकसित भारताची मुहूर्तमेढ रोवणारी निवडणूक- पंतप्रधान आणि भाजपा नेते नरेंद्र मोदी यांचं वर्ध्याच्या प्रचारसभेत प्रतिपादन
3. तिसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपली; आज होणार अर्जांची छाननी
4. उन्हाळ्याच्या सुटीसाठी रेल्वेचं प्रवासी गाड्यांच्या विक्रमी 9 हजार 111 फेऱ्यांचं आयोजन आणि
5. राज्यात उन्हाच्या झळा वाढल्या, अनेक शहरांत कमाल तापमान 40 अंशांच्या पुढे

**<u>मतदान</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात देशभरातल्या 102 मतदार संघांमध्ये काल मतदान झालं. प्राथमिक आकडेवारीनुसार देशात पहिल्या टप्प्यात सरासरी 62.37 टक्के मतदान झाल्याचं निवडणूक आयोगानं सांगितलं. सर्वसाधारणपणे मतदान शांततेत पार पडलं. अनेक ठिकाणी उन्हाच्या तीव्र झळा असूनही मतदारांमध्ये आपलं नागरी कर्तव्य पार पाडण्याचा उत्साह दिसून आला.

राज्यात काल विदर्भातल्या पाच मतदार संघात सायंकाळी 6 वाजेपर्यंत अंदाजे सरासरी 60.22 टक्के मतदान झालं असल्याची माहिती  मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली. रामटेक 58.50 टक्के, नागपूर 53.71 टक्के, भंडारा-गोंदिया 64.08 टक्के, गडचिरोली-चिमूर 67.17 टक्के आणि 13-चंद्रपूर 60.03 टक्के मतदानाची नोंद झाली

पहिल्या टप्प्यात नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, विकास ठाकरे, सुनिल मेंढे, चंद्रशेखर बावनकुळे, विजय वडेट्टीवार, सरसंघचालक मोहन भागवत, विलास मुत्तेमवार, धर्मरावबाबा आत्राम यांच्यासह अनेक मान्यवरांनी कुटुंबासह मतदानाचा हक्क बजावला.

गडचिरोली शहरात नवमतदार, दिव्यांग, वृध्द मतदारांची मतदार रथामध्ये बसवून वाजत गाजत मिरवणूक काढून त्यांना मतदान केंद्रापर्यंत नेण्यात आलं. रामटेक तालुक्यातल्या कट्टा इथं बांबू आणि वन आधारित संकल्पनेवर तर नागपूर शहरात शंकर नगर इथं वस्त्रोद्योग संकल्पनेवर आधारित मतदान केंद्र उभारण्यात आलं होतं. भंडारा गोंदिया मतदारसंघात प्रचंड उन्हामुळे मतदार संध्याकाळी मतदान केंद्रावर यायला सुरुवात झाली. त्यामुळे 6 वाजेपर्यंत मतदान केंद्रावर पोहोचलेल्या मतदारांना मतदान करण्याची परवानगी देण्यात आली.

गडचिरोली जिल्ह्यात गडचिरोली पंचायत समिती इथं मतदान केंद्रातली संपूर्ण व्यवस्था पाहण्यासाठी केवळ महिला कर्मचाऱ्यांची नेमणूक केली होती. या पिंक मतदान केंद्रावर मतदान करणाऱ्या श्रेया मराठे या नवमतदार युवतीची ही प्रतिक्रिया...

केंद्रिय मंत्री नितीन गडकरी, राज्यातले मंत्री सुधीर मुनगंटीवार, महाविकास आघाडीचे नेते विकास ठाकरे, प्रतिभा धानोरकर यांच्यासह एकंदर 97 उमेदवारांचं राजकीय भवितव्य काल मतदान यंत्रात बंद झालं.

**प्रचार**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील मतदानासाठीच्या प्रचारानं आता वेग घेतला आहे. दुसऱ्या टप्प्यात 26 एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

2024 ची लोकसभा निवडणूक आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीसाठीची, विकसित भारताची मुहूर्तमेढ रोवणारी निवडणूक आहे असं पंतप्रधान आणि भाजपा नेते नरेंद्र मोदी काल वर्धा इथं प्रचारसभेत म्हणाले. भाजपा सरकारनं केलेल्या विकासकामांची माहिती त्यांनी दिली. भाजपाचे वर्ध्याचे उमेदवार रामदास तडस आणि अमरावतीच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या प्रचारार्थ ही सभा घेण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अन्य नेते उपस्थित होते.

आगामी काळात आरक्षणाचा प्रश्न सोडवण्याचं काम वंचित बहुजन आघाडीच करेल असा विश्वास ॲडव्होकेट प्रकाश आंबेडकर यांनी काल नांदेडमधल्या प्रचारसभेत व्यक्त केला. जरांगे पाटलांच्या आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व मराठ्यांनी आणि इतर मागास वर्गीयांनी वंचित बहुजन आघाडीला साथ द्यावी असं आवाहन त्यांनी केलं. दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या टप्प्यातल्या निवडणुकीसाठीच्या प्रचाराला अनेक उमेदवारांनी प्रचारफेऱ्या काढून सुरुवात केली.

पुणे जिल्ह्यातल्या मावळ लोकसभा मतदार संघातले महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघिरे यांनी नुकतंच कर्जत विधानसभा क्षेत्रात नागरिक आणि व्यावसायिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तर भारतीय जनता पार्टीचे पुण्याचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी पदयात्रा काढून नागरिकांशी संवाद साधला. काँग्रेसचे पुणे मतदारसंघाचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांनीही प्रचारासाठी पदयात्रा काढून मतदारांच्या भेटीगाठी घेण्यावर भर दिला.

**उमेदवारी अर्ज**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत काल संपली. यात रायगड, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, बारामती, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि हातकणंगले या 11 मतदारसंघात 7 मे रोजी मतदान होणार आहे. आज अर्जांची छाननी होणार असून सोमवारपर्यंत अर्ज मागं घेण्याची मुदत आहे. मुदतीअखेर 361 उमेदवारांचे 522 अर्ज दाखल झाले.

या टप्प्यासाठी रत्नागिरी सिंधुदुर्ग मतदारसंघातून केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी काल उमेदवारी अर्ज दाखल केला. भाजपा आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते यावेळी उपस्थित होते. दरम्यान, या मतदार संघातले विद्यमान खासदार, शिवसेना ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांनी काल पुन्हा एकदा उमेदवारी अर्ज सादर केला. उस्मानाबाद मतदार संघात महायुतीतल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या उमेदवार अर्चना राणा जगजीत सिंह पाटील यांनीही काल उमेदवारी अर्ज भरला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. सोलापूर जिल्ह्यातल्या सोलापूर मतदारसंघात 41 तर माढा मतदारसंघात 42 उमेदवारांनी काल उमेदवारी अर्ज सादर केले.

सांगली लोकसभा मतदारसंघात शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार चंद्रहार पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. आमदार सुधीर गाडगीळ, सुरेश डेंगळे यांच्यासह काही अपक्ष उमेदवारांनीही काल उमेदवारी अर्ज भरले. सातारा जिल्ह्यात कालपर्यंत 33 उमेदवारी अर्ज भरण्यात आले. कोल्हापूर मतदारसंघात 28 तर हातकणंगले मतदारसंघात 36 उमेदवारांनी उमेदवारी अर्ज भरले आहेत. राज्यातल्या चौथ्या टप्प्यातल्या 11 मतदारसंघातही अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. शिर्डी लोकसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांनी काल आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी आदित्य ठाकरे उपस्थित होते.

**छगन भुजबळ**

नाशिक लोकसभा मतदार संघातून निवडणूक न लढवण्याचा निर्णय मंत्री छगन भुजबळ यांनी घेतला आहे. महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारात सहभागी होऊन महायुतीची ताकद आणखी वाढवणार असल्याचं त्यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत सांगितलं. तीन आठवड्याचा वेळ होऊनही नाशिकमधे महायुतीची उमेदवारी जाहीर झाली नाही. उमेदवारी जाहीर व्हायला उशीर होत असल्यानं महायुतीचं नुकसान होऊ शकतं त्यामुळे लवकरात लवकर निर्णय घेण्याच्या दृष्टीनं सर्वांच्या मनातील संदिग्धता दूर करण्यासाठी माघार घेतली असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**मतदार जागृती-कोल्हापूर**

कोल्हापूर जिल्ह्यात शिरोली इथं मतदार जागृतीसाठी 18 शाळांमधल्या 3 हजार विद्यार्थी आणि दोनशे शिक्षकांनी मिळून शिरोली विद्यालयाच्या प्रांगणात रांगोळी काढली. तसंच प्रभात फेरी आणि पथनाट्याद्वारे मतदार जनजागृती करण्यात आली.

**रेल्वे**

उन्हाळ्याच्या सुटीतली प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन रेल्वेनं या हंगामात प्रवासी गाड्यांच्या विक्रमी 9 हजार 11 फेऱ्यांचं आयोजन केलं आहे. गेल्या वर्षीच्या उन्हाळ्यातल्या फेऱ्यांपेक्षा ही संख्या 2742 नं अधिक आहे. महाराष्ट्रासह अन्य 13 राज्यांमध्ये रेल्वेच्या विभागीय मंडळांनी या अतिरिक्त प्रवासी गाड्यांचं नियोजन केलं आहे. सर्व रेल्वे स्थानकांवर पिण्याचं पाणी उपलब्ध करुन देण्याचे तसंच गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी चोख व्यवस्था तैनात करण्याचे निर्देश वरीष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

**स्वच्छ सर्वेक्षण-धुळे**

धुळे जिल्हा स्वच्छ सर्वेक्षण 2024 अंतर्गत धुळे शहरातील 41 सफाई कर्मचाऱ्यांचा उत्कृष्ट काम केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. मुख्य स्वच्छता निरीक्षक राजेश वसावे आणि स्वच्छता निरीक्षक चंद्रकांत जाधव यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र आणि गुलाब पुष्प देऊन या कामगारांना सन्मानित करण्यात आलं.

**कारवाई**

पुणे जिल्ह्यातल्या मावळ मतदारसंघात काल मुंबई पुणे द्रुतगती मार्गालगत बोर इथं अनधिकृत जाहिरात फलकावर कारवाई करण्यात आली. विनापरवानगी जाहिरात फलक लावल्याचं आढळल्यास संबंधिताविरूद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा निवडणूक प्रशासनानं दिला आहे.

**हवामान**

राज्यात बऱ्याच ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत काहीशी वाढ झाली आहे. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान मालेगाव इथं 43 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. पुणे, अहमदनगर, सोलापूर, जळगावसह विदर्भ मराठवाड्यातल्या अनेक शहरांत तापमानाचा पारा 40 अंशांच्या पुढे गेला आहे. नाशिक, सातारा, सांगली, कोल्हापूर शहरांमध्येही काल कमाल तापमान 40 अंशांच्या आसपास होतं. आज मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाचा हवामान विभागाचा अंदाज आहे. कोकणात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.